# पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास : रसेलकृत परिचय

'तात्त्विक' सजमली जाणारी जीवन आणि जगत् विषयीची संकल्पना दोन मुख्य घटकांनी बनलेली आहे. पहिला - परंपरेने चालत आलेल्या धार्मिक व नैतिक संकल्पना; दुसरा घटक म्हणजे अशा पद्धतीची अन्वेषणा की जिला 'वैज्ञानिक' म्हणता येईल. (येथे 'वैज्ञानिक' ही संज्ञा कमाल व्यापक अर्थाने आयोजिली आहे.) कोणत्याही प्रणालीत प्रतीत होणाऱ्या या दोन घटकांच्या कमी-जास्त प्रमाणांनुसार तत्त्वज्ञांची विभागणी झालेली आहे.

'तत्त्वज्ञान' हा शब्द अनेकार्थी उपयोगात आणला गेला आहे, काही व्यापक अर्थाने, काही संकुचित अर्थाने त्या शब्दाचे उपयोजन झालेले आहे. मी तो खूपच व्यापक अर्थाने वारपणार आहे. तोच अर्थ आता स्पष्ट करण्याचा प्रयत्न मी करतो.

माझ्या समजुतीप्रमाणे 'तत्त्वज्ञान'[१] हा शब्द ईश्वरशास्त्र ( Theology) आणि विज्ञान (Science) यांच्या 'मध्ये' कुठेतरी येतो. ईश्वरशास्त्राप्रमाणेच ज्यांचे अद्यापपर्यंत तरी निश्चित ज्ञान होऊ शकलेले नाही, अशा गोष्टींविषयी तत्त्वज्ञानात तर्क (Speculations) केले जातात. पण विज्ञानाप्रमाणेच त्याचे आवाहन एखाद्या आप्तप्रामाण्यापेक्षा (Authority) मानवी प्रज्ञेलाच अधिक असते - मग ते परंपरेचे असो वा साक्षात्कारविषयक (!) असो. माझ्या धारणेनुसार सर्व 'निश्चित ज्ञान' हे विज्ञानविषय असते, तर या निश्चित ज्ञानापलिकडील गोष्टींविषयीची सर्व आग्रही मते (dogmas) ईश्वरशास्त्रात मोडतात (असे मला वाटते). पण अशा ईश्वरशास्त्र आणि विज्ञान यांच्या दरम्यान एक 'निर्जन प्रदेश' (No Man's Land) आहे की ज्याच्यावर वरील दोन्ही बाजूंनी सतत हल्ले होत राहातात; हा प्रदेश म्हणजे 'तत्त्वज्ञान'. चिंतनात्मक मनाचे जवळपास सर्व प्रश्न विज्ञानात अनुत्तरित राहतात अन् ईश्वरवाद्यांची गेल्या काही शतकांपर्यंतची छातीठोक उत्तरे आता संशयास्पद ठरू लागली आहेत. जगाची विभागणी मन आणि जडद्रव्य अशी झाली आहे काय ? जर तसे असेल तर मन म्हणते काय ?

जडद्रव्य म्हणजे काय ? मन जडद्रव्याचा विषय होऊ शकते काय ? की मनाकडे काही स्वतंत्र शक्ती (अथवा क्षमता) आहेत ? या अखिल ब्रह्माण्डाला काही एक हेतू अथवा एकात्मता असे काही आहे काय ? एखाद्या विशिष्ट उद्दिष्टाप्रत ते उत्क्रान्त होत आहे काय ? निसर्गनियम खरोखरीच आस्तित्वात आहेत की आपल्याला व्यवस्थेविषयी उपजत प्रेम असल्याने आपण त्यांच्यावर विश्वास ठेवतो? मानव खगोलशास्त्रज्ञाला जसा दिसतो तसा - म्हणजे एका क्षुद्र व बिनमहत्त्वाच्या ग्रहावर अशुद्ध कार्बन व पाणी यांनी मिळून बनलेला एक छोटासा असहाय्यपणे सरपटणारा गोळा आहे ? की मग तो हॅम्लेटला दिसतो तसा आहे? की एकाच वेळी तो दोन्हीही आहे ? जगण्याची, एक आर्य म्हणविली जाणारी अशी पद्धती (Noble way) अन् दुसरी हीन/क्षुद्र पद्धती, अशा काही पद्धती असतात काय ? की जगण्याच्या सर्व पद्धती निरुपयोगीच आहेत ? समजा, जगण्याची 'आर्य पद्धती' असेलच तर ती कशात सामावलेली आहे आणि ती आपणाला कशी प्राप्त करून घेता येईल? चांगुलपण मूल्यवान ठरण्यासाठी चिरंतन असले पाहिजे की सारे ब्रह्माण्डच अनिवार्यतेने विनाशाकडे जात असले तरीही चांगुलपणाचा शोध घेणे योग्यच ठरते ? 'शहाणपण' म्हणून असे काही खरेच आहे की जे 'शहाणपण' आहे असे वाटते ते वस्तुतः मूर्खपणालाच दिलेले अंतिम सुसंस्कृत रूप आहे ?

अशा प्रश्नांची उत्तरे प्रयोगशाळेत प्रयोग करून प्राप्त करून घेता येत नाहीत ! ईश्वरशास्त्रांनी त्यांची उत्तरे देण्याचा आव आणला, ती अधिकच निश्चित उत्तरे होती. पण त्यांच्या या निश्चिततेमुळेच आधुनिक मने त्यांकडे साशंकतेने पाहू लागली. अशा प्रश्नांची उत्तरे देण्याचा नाही, किमान त्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न हे तत्त्वज्ञानाचे काम आहे.

आता, तुम्ही विचाराल, मग अशा असाध्य प्रश्नांच्या नादी लागून वेळ दडवायचाच कशाला ? तर यावर एखादा, इतिहासकाराच्या भूमिकेतून उत्तर देईल किंवा एखादा 'वैश्विक एकाकीपणाच्या भयाला तोंड देणाऱ्या व्यक्तीच्या' भूमिकेतून !

या पुस्तकातून मी यथाशक्ती जे उत्तर देणार आहे ते इतिहासकाराच्या भूमिकेतून. मुक्त चिंतनाची क्षमता मानवाला प्राप्त झाल्यापासून मानवाच्या सर्व कृती; विश्व अन् मानवी जीवन या विषयीच्या चांगले काय- वाईट काय,

याविषयीच्या त्याच्या अगणित दृष्टिकोनांतून उदयास आलेल्या उपपत्तींवर अवलंबून रहात आल्या आहेत. हे पूर्वी केव्हाही जितके सत्य होते, तितकेच आजही सत्य आहे. एखादा कालखंड किंवा एखादे राष्ट्र समजावून घ्यावयाचे असेल तर आपण त्या कालखंडाचे किंवा त्या राष्ट्राचे तत्त्वज्ञान समजावून घेतले पाहिजे. अन् ते तत्त्वज्ञान समाजावून घेण्यासाठी आपणही काही प्रमाणात तत्त्वचिंतक असणे आवश्यक आहे. आता, इथे एक पारस्परिक कार्यकारणभाव आहे : व्यक्तीच्या जीवनविषयक परिस्थितीचा त्याचे तत्त्वज्ञान ठरविण्यात मोठा वाटा असतो, पण उलटपक्षी त्यांच्या तत्त्वज्ञानाचाच त्यांची परिस्थिती ठरविण्यात मोठा वाटा असतो. शतकानुशतके चालत आलेली ही आंतरक्रिया हाच आपल्या, पुढील पृष्ठांचा चिंतनविषय असणार आहे.

तथापि वरील प्रश्नाला एक अधिक व्यक्तिगत उत्तरही असू शकते. आपण काय जाणू शकतो, हे विज्ञान आपणास सांगते. पण आपण जे जाणू शकतो ते तर अत्यल्प आहे. अन् आपण जर 'आपण काय जाणू शकत नाही' हे विसरलो तर अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींबाबतही आपण संवदेनहीन, अंध बनतो. ईश्वरशास्त्र मात्र आपल्यामध्ये असा हट्टाग्रही विश्वास जागवते की 'आपणास ज्ञान आहेच'. प्रत्यक्षात मात्र आपण त्याविषयी अज्ञानी असतो ! आणि तसे करण्यातून ईश्वरशास्त्र आपल्यात अखिल चराचराविषयी एका प्रकारचा उन्मत्तपणा निर्माण करते ! सुस्पष्ट आशा व भीती यांच्या सांनिध्यात - अनिश्चिपणा हा क्लेशदायी ठरतो. पण आरामदायी परिकथांच्या आधाराशिवाय जगावयाचे असेल तर अनिश्चितपणा हा सहन केलाच पाहिजे.

तत्त्वज्ञान जे प्रश्न विचारते ते एकतर विसरून जाणे अथवा त्यावर आपणास संशयातीत उत्तरे मिळाली आहेत, अशी स्वतःची समजूत करून घेणे, हे योग्य नव्हे. अशा पार्श्वभूमीवर निश्चितता नसतानाही कसे जगावयाचे आणि तेही द्विधा मनस्थितीने पांगळे न होता, हे तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांना शिकविण्याचे प्रमुख कार्य, मला वाटते, आपल्या युगात तत्त्वज्ञान अजूनही पार पाडू शकेल.

ईश्वरशास्त्राहून अलग स्वरूपातील असे हे तत्त्वज्ञान उदय पावले ते प्राचीन ग्रीसमध्ये, इसवीसनापूर्वी सहाव्या शतकात. प्राचीन काळात आपले कार्य केल्यावर जेव्हा ख्रिस्ती धर्माचा उदय झाला व रोमन साम्राज्याचा पाडाव झाला, तेव्हा ते (तत्त्वज्ञान) पुन्हा ईश्वरशास्त्रात विलीन झाले. पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा दुसरा मोठा

कालखंड म्हणजे ११वे ते १४वे शतक. या कालखंडावर कॅथॉलिक चर्चचा पगडा होता. थोडकीच मोठी बंडे याला अपवाद आहेत, उदाहरणार्थ फ्रेडरिक दुसरा - याचा काल (११९५-१२५०). या कालखंडाचा शेवट झाला तो गोंधळाने आणि त्याची परिणती झाली ती प्रबोधनात. सतराव्या शतकापासून आजपर्यंतचा तो तिसरा कालखंड. त्यावर प्रभाव आहे तो तत्त्वज्ञानाच्या कुठल्याही एका पूर्वसूरीपेक्षाही जास्त करून विज्ञानाचा. या काळातही पारंपरिक धार्मिक श्रद्धा महत्त्वाच्या असताताच, पण त्यांचे समर्थन गरजेचे वाटू लागते. आणि विज्ञानाने जिथे जिथे ते भाग पाडले तिथे तिथे त्यात सुधारणाही केल्या. कॅथॉलिक चर्चच्या दृष्टिकोनानुसार पाहता या कालखंडातील तत्त्वचिंतक सनातनी असे नव्हतेच. आणि या काळातील तत्त्वचिंतकांच्या चिंतनामध्येही चर्चपेक्षा - इहवादी (Secular) नगरराज्यासच अधिक महत्त्व आले.

एकूणच या कालाखंडात एक समान गोष्ट आढळते. ती अशी की धर्म आणि विज्ञान यांच्याप्रमाणेच सामाजिक सामंजस्य व व्यक्तिस्वातंत्र्य यांच्यात सातत्याने संघर्ष तरी चालू होता किंवा अस्वस्थ करणारा समझोता तरी होत राहिला होता. ग्रीसमध्ये नगरराज्यांशी [२] एकनिष्ठ राहण्यातून सामाजिक सामंजस्य सुरक्षित ठेवले गेले होते. सम्राट ॲलेक्झांडर एकीकडे नगरराज्ये कालबाह्य ठरवीत असतानासुद्धा दुसरीकडे ॲरिस्टॉटलला नगरराज्यांशिवाय दुसरा राज्यसंस्थेचा प्रकार उचित वाटत नव्हता. नगराशी व्यक्तीच्या असलेल्या कर्तव्यामुळे प्रत्येक नगरराज्यात व्यक्तिस्वातंत्र्याचा कमी-जास्त प्रमाणात संकोच होत असे. जेवढे व्यक्तिस्वातंत्र्य आज आधुनिक जर्मनी किंवा रशियात आहे तेवढे मर्यादित व्यक्तिस्वातंत्र्य तत्कालीन स्पार्टामध्ये होते. उलटपक्षी अथेन्समध्ये प्रासंगिक छळणुकीचा अपवाद वगळता, नगराच्या उर्जितावस्थेच्या काळात, राज्याकडून लादल्या जाणाऱ्या बंधनापासून नागरिकांना कमालीचे स्वातंत्र्य होते. ॲरिस्टॉटलपर्यंतचा ग्रीक विचारप्रवाह राज्याविषयीच्या धार्मिक देशभक्तीने भरलेला होता. या प्रवाहातील सर्व नैतिक प्रणाली नागरिकांच्या जीवनाशी निगडीत होत्या. आणि त्यातील एक मोठा घटक राजकीय होता. ग्रीक जेव्हा गुलाम झाले - प्रथम मॅकेडोनिअन व नंतर रोमन साम्राज्याचे - तेव्हा त्यांच्या काळाशी अनुरूप असलेल्या त्यांच्या स्वातंत्र्यांच्या संकल्पनांना अर्थच उरलेला नव्हता. त्यामुळे काय झाले ? तर एका बाजूला परंपरेपासून तुटल्याने त्यांचा तेजोभंग झाला तर

दुसऱ्या बाजूला 'अधिक व्यक्तिगत व कमी सामाजिक' अशा स्वरूपाची नीती आली. 'सद्गुणसंपन्न जीवन म्हणजे राज्याशी नाते' असा विचार करण्याऐवजी स्टोइक चिंतकांनी 'सद्गुणसंपन्न जीवन म्हणजे परमेश्वराशी नाते' असा विचार मांडला. अशा रीतीने स्टोइक चिंतकांनी ख्रिस्ती धर्माच्या आगमनासाठी जणू रस्ताच तयार करून ठेवला. ख्रिस्तीधर्म हा स्टोइक तत्त्वज्ञानाप्रमाणेच मुळात अराजकीय होता. कारण पहिल्या तीन दशकात त्यांच्या पुरस्कर्त्यांचा प्रशासनावर व राज्यशासनावर प्रभाव नव्हता. ॲलेक्झांडरपासून ते कॉंस्टन्टाईनपर्यंतच्या साडेसहाशे वर्षात सामाजिक सहकार्यभाव सुरक्षित होता; पण तो तत्त्वज्ञान आणि जुन्या निष्ठामुळे नव्हे तर दंडशक्तीमुळे - प्रथम लष्कराच्या आणि नंतर नागरी प्रशासनाच्या. रोमन लष्कर, रोमन कायदेकानू, रोमन अधिकारी वर्ग आणि रोमन रस्ते यांनीच प्रथम ग्रीसमध्ये एक प्रबळ एक केंद्रीत राज्य निर्माण केले आणि टिकविलेही. रोमन तत्त्वज्ञानाचा त्यात काहीच सहभाग नव्हता. कारण ते अस्तित्वातच नव्हते !

या प्रदीर्घ कालखंडात स्वातंत्र्ययुगापासून रुजलेले ग्रीक विचार एका संथ परिवर्तनप्रक्रियेतून गेले. काही प्राचीन विचार तर, ज्यांचा आपण विशेषत्वाने धार्मिक म्हणून उल्लेख करणे योग्य होईल, तुलनेने अधिक महत्त्व पावले तर दुसरे काही विचार जे अधिक बुद्धिनिष्ठ होते ते विच्छेदित करण्यात आले. कारण काळाच्या पावलांशी ते सुसंगत नव्हते. अशा रीतीने उत्तरकालीन ख्रिस्ती 'मूर्तिपूजकांनी' (pagans)[४] ग्रीक संस्कृती-परंपरेचा अंतर्भाव ख्रिस्ती सिद्धांतात करणे सोयिस्कर ठरेपर्यंत या परंपरेची काटछाट व मांडामांड केली.

ख्रिस्ती धर्माने एक महत्त्वाचे मत लोकप्रिय केले जे मुळातच स्टोइकांच्या शिकवणुकीत अनुस्यूत होते. पण प्राचीन काळातील सर्वसाधारण विचाराला तसे ते परकेही होते. ते मत म्हणजे 'व्यक्तीला राज्याच्या संदर्भात जे कर्तव्य असते त्यापेक्षा परमेश्वराच्या संदर्भातील त्याचे कर्तव्यच अधिक महत्त्वाचे आहे'(अ त्याचप्रमाणे याच मताचे रुपडे असलेले आणखी एक 'आपण माणसांपेक्षा परमेश्वराचीच आज्ञा मानली पाहिजे' हे मत सॉक्रेटिस आणि इतर प्रेषितांनीही उद्धृत केले होते. ते कॉंस्टस्टाईन राजांचे धर्मांतर होईपर्यंत तगून राहिले. कारण प्रारंभीचे ख्रिस्ती सम्राट एक एरिअन [५] तरी होते किंवा एरिअनवादाकडे झुकणारे तरी होते. हे सम्राट जेव्हा सनातनी बनले तेव्हा या मताला तात्पुरती स्थगिती

मिळाली. बायझंटाईन साम्राज्यात तसेच त्यानंतरच्या रशिअन् साम्राज्यातही ते सुप्त रूपात राहिले. पैकी रशियन साम्राज्याने आपली ख्रिश्चँनिटी कॉंस्टँटीनोपल साम्राज्याकडून उचलली. (ब) पण पश्चिमेत (गॉलचे काही भाग वगळता) जिथे कॅथॉलिक सम्राटांची जागा जवळजवळ लगेचच पाखंडी, असंस्कृत (बार्बेरिअन) जेत्यांनी घेतली, तिथे राजनिष्ठेवरील धर्मनिष्ठेचे वर्चस्व टिकून राहिले. आणि काही प्रमाणात ते अद्यापही टिकून आहे.

या असंस्कृत जेत्यांच्या आक्रमणाने सहा शतकेपर्यंत पाश्चात्य संस्कृतीचा अंत केला. नवव्या शतकात डेन्स (Danes) [६] राज्यकर्त्यांनी या आक्रमणाचा पाडाव करेपर्यंत आयर्लंडमध्ये हे आक्रमण रेंगाळत होते. तेथे विसावण्यापूर्वी या आक्रमणाने एक महत्त्वाची व्यक्ती जगाला देणगी स्वरूपात दिली : स्कॉटस एरिजेना.[७] कॉंस्टॅन्टिनोपलचा १४५३ मध्ये पाडाव होईपर्यंत पौर्वात्य साम्राज्यांमध्येही ग्रीकसंस्कृती एखाद्या वस्तुसंग्रहालयात राहावी तशी पण विस्कळीत स्वरूपात टिकली. अर्थात या पाडावाच्या घटनेतून एक कलापरंपरा आणि रोमन कायद्याच्या जस्टोनिअन संहितेखेरीज अन्य काही कॉंस्टॅन्टिनोपलमधून बाहेर जाऊ शकले नाही.

तमोयुगात म्हणजे पाचव्या शतकाच्या अखेरपासून ते अकराव्या शतकाच्या मध्यापर्यंत पाश्चात्य रोमन जगतात काही अत्यंत मनोरंजक असे बदल घडून आले. ख्रिश्चन धर्माने सुरू करून दिलेल्या ईशकार्य व राज्यकार्य यामधील संघर्षाने चर्च आणि राजा यांच्यातील संघर्षाचे रूप धारण केले. पोपची धर्मविषयक सत्ता इटली, फ्रान्स, स्पेन, ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंड, जर्मनी, स्कॅंडिनेव्हीया तसेच पोलंडमध्ये पसरली. प्रथम दक्षिण फ्रान्स आणि इटलीबाहेर बिशप व मठाधिपतींवरील पोपचे नियंत्रण अल्प होते. पण ग्रेगरी-सातवा (अकराव्या शतकाचा उत्तरार्थ) - याच्या उदयानंतर ते नियंत्रण खरेखरे आणि परिणामकारक बनले. त्यावेळेपासून ख्रिश्चन धर्मोपदेशकवर्गाने संपूर्ण युरोपभर अत्यंत अक्कलहुशारीने आणि निष्ठुरतेने रोमच्या दिग्दर्शनाखाली एककेंद्रित संघटना बांधली. इहवादी राज्यकर्त्यांबरोबरच्या संघर्षात १३०० सालापर्यंत त्यांनी विजयच संपादन केला. चर्च आणि राजसत्ता यांचा हा संघर्ष केवळ धर्मोपदेशक आणि सामान्यजन असा नव्हता तर मेडिटेरिनिअन् जग आणि उत्तरेकडील बर्बर लोक यांच्यातील संघर्षाचे ते नूतनीकरणही होते. चर्चची एकता हा रोमन

साम्राज्याच्या एकतेचा प्रतिध्वनी होता. चर्चचे सर्व धार्मिक विधी लॅटिन भाषेत होत असत. आणि त्यावर प्रभुत्व गाजविणाऱ्या बहुतेक व्यक्ती होत्या इटालिअन, स्पॅनिश किंवा दक्षिणी फ्रेंच. जेव्हा त्यांच्या शिक्षणप्रणालींचे पुनरुज्जीवन झाले तेव्हा त्यांचे शिक्षण अभिजात होते, त्यांच्या कायदेविषयक आणि शासनविषयक संकल्पनासुद्धा तत्कालिक सम्राटांपेक्षा मार्क्स ऑरेलियस[८] यालाच अधिक आकळतील अशा होत्या. चर्च एकाचवेळी भूतकालाच्या सातत्याचे प्रातिनिधीत्व करीत असे व त्या काळातील प्रगततम संस्कृतीचेही प्रातिनिधीत्व करीत असे.

या उलट इहवादी सत्ता जर्मनवंशीय राजांच्या आणि जहागिरदारांच्या (Teutonic descent),[९] हाती एकवटलेली होती. जर्मनीच्या जंगलसंपत्तीतून निर्माण केलेल्या संस्थांपैकी शक्य त्याचे जतन करण्याचा या जहागीरदारांचा हा प्रयत्न होता. निखळ सत्ता या संस्थांना पारखीच होती. कायद्याची बाबसुद्धा या संस्थांना पारखीच होती, जी या शक्तिशाली जेत्यांना कंटाळवाणी आणि निःसत्त्व वाटत असे ! राजाला संरजामी उमरावशाहीस सत्तेत वाटा द्यावा लागला. त्याबरोबर आपल्या युद्ध, खून, लूटमारी किंवा बलात्कार या सारख्या नैमित्तिक विकारोद्रकास मुभाही मिळावी, अशीही त्यांची (- राजांची) अपेक्षा होती. अर्थात् सम्राट हे मनापासून धर्मशील असल्यामुळे राजांनी पश्चात्ताप व्यक्त केला असणेही शक्य आहे आणि अर्थातच पश्चाताप व्यक्त करणे हा एक विकाराचाच प्रकार आहे; पण एखादा आधुनिक मालक आपल्या नोकरांकडून ज्या शांत व सातत्यपूर्ण चांगल्या वागणुकीची अपेक्षा करतो आणि मिळवितोही, तशी चांगली वागणूक या राजांमध्ये निर्माण करणे चर्चला कधीच जमले नाही. अंतराम्याच्या मागण्यांप्रमाणे पिता येत नाही, खूनखराबा करता येत नाही आणि प्रेमही करता येत नसेल तर जग जिंकून उपयोग तरी काय ? ज्यांनी ब्रह्मचर्याची शपथ वाहिली आहे, ज्यांच्याकडे सैन्यबळ नाही, अशा काही पोथी-पंडितांच्या आदेशापुढे गर्विष्ठ सरदारांच्या आपल्या लष्करासह राजांनी मान का तुकवावी ? चर्चला अमान्य असतानाही युद्धाची खुमखुमी त्यांनी जागवत ठेवली. स्पर्धात्मकता आणि सभ्य प्रेम यांचा विकास केला. अपवादात्मक प्रसंगी भावनावेगात येऊन त्यांनी काही प्रमुख धर्मोपदेशकांची हत्याही केली.

सर्व सैन्यबळ राजांच्या बाजूने होते, तरीही चर्चच विजयी ठरले. काही अंशी शिक्षणप्रक्रिया हाती असल्याने तर काही अंशी राजेच परस्परांच्या चढाईत

गुंतल्याने चर्चचा विजय झाला असला, तरी त्यामागचे मुख्य कारण होते ते म्हणजे 'चर्चच्या हातीच कळीची सत्ता आहे', ही काही अपवाद वगळता सर्व राज्यकर्त्यांची आणि जनतेची श्रद्धा होती. मृत्यूनंतर राजांनी स्वर्गात जीवन व्यतीत करावयाचे की नरकात, हे चर्चच ठरवीत असे. एवढेच नव्हे तर राजनिष्ठेच्या कर्तव्यातून मुक्ती देण्याचे आणि पर्यायाने बंडखोरांना उत्तेजन देण्याचे कामही चर्चच करी. पुढे जाऊन, जिथे प्रत्यक्षात अराजक होते, तिथे सुव्यवस्थेचेही प्रतिनिधीत्व चर्चने केले. आणि परिणामतः नवोदित व्यापारीवर्गाचा भरघोस पाठिंबा मिळविला. विशेषतः इटलीत हा अखेरचा मुद्दा अधिकच निर्णायक ठरला.

चर्चचे आंशिक का होईना स्वातंत्र्य टिकविण्याचे जर्मनवंशीयांचे (Teutonic) प्रयत्न केवळ राजकारणातूनच जाणवले असे नाही, तर कला, प्रणय, मध्ययुगीन शिष्टाचार व युद्ध यातूनही प्रतीत झाले. बौद्धिक जगतात मात्र असे प्रयत्न फारसे दिसून आले नाहीत. कारण जवळपास सगळेच शिक्षण धर्मोपदेशकांच्या हाती होते. विशेषतः मध्ययुगीन प्रकट तत्त्वज्ञान हा काही त्या काळाचा आरसा नव्हे तर एका पक्षाचे विचार काय होते त्याचेच ते प्रतिबिंब आहे. तथापि काही धर्मोपदेशकांचे विशेषतः फ्रांसिसी महंतांच्या एका गटाचे विविध कारणांमुळे पोपशी मतभेद होते. आल्पस् प्रातांच्या उत्तर भागाच्या इटलीत काही शतके अगोदरच संस्कृती सामान्य माणसांपर्यंत पसरली. नव्या धर्माची गुढी उभारण्याचा प्रयत्न करणारा फ्रेडरिक - दुसरा - हा पोपविरोधी संस्कृतीचा टोकाच्या भूमिकेचा प्रतिनिधी होता, तर फ्रेडरिकच्याच राज्यात जन्माला आलेला थॉमस ॲक्विनास हा पोपच्या तत्त्वज्ञानाचा अभिजात पुरस्कर्ता म्हणून आजही ओळखला जातो. यानंतर पन्नास वर्षाच्या प्रतीक्षेनंतर डान्टेने समन्वय साधला आणि त्याने संपूर्ण मध्ययुगीन विचारविश्वाचे एकमेव संतुलित दर्शन जगाला घडविले. पण डान्टेनंतर राजकीय तसेच बौद्धिक कारणांमुळे हा मध्ययुगीन तत्त्वज्ञानात्मक समन्वय बंद पडला. जेव्हा तो टिकून होता, तेव्हा त्यात एक नीटनेटकेपणा होता व छोटेखानी पूर्णत्व होते; या (समन्वयात्मक) प्रणालीने ज्याची ज्याची दखल घेतली, त्याचा त्याचा आपल्या सान्त विश्वातील इतर विषयांशी संबंध जोडून ते नेमकेपणाने मांडले. पण 'महान दुही' ( The Great schism) [१०], 'कोन्सिलीएअर चळवळ' (The Conciliar movment) [११] आणि नवजीवनकालीन(Renaissance) पोपसत्ता यातूनच पुढे पुनर्रचनायुग

(Reformation) आले. त्याने खिस्ती जगताच्या ऐक्याला आणि पोपकेंद्रीत शासनविषयक उपपत्तीला सुरुंग लावला. नवजीवन कालखंडात प्राचीन काळाविषयीच्या तसेच पृथ्वीसंबंधीच्या नव्या ज्ञानापुढे लोकांना प्रणालींचा कंटाळा आला. या प्रणाली म्हणजे त्यांना मानसिक तुरुंगच वाटू लागला. कोपरनिकसच्या सूर्यकेंद्री विश्वरचनासिद्धान्ताने पृथ्वीला व मानवाला, टॉलेमीच्या सिद्धान्ताने जे दिले, त्यापेक्षाही अधिक विनम्र स्थान दिले. नवा सिद्धान्त आनंददायी, सत्य व उपयुक्त होता. बुद्धिमंतांना तार्किक विचार, विश्लेषण व प्रणालीकरण यात जो रस होता त्याची जागा नव्या तथ्यांविषयीच्या रसाने घेतली. कलाक्षेत्रात हे नवजीवन अजूनही सुव्यवस्थितपणे घडून येत असले तरीही वैचारिक क्षेत्रात मात्र ते अव्यवस्थिपणे घडले. अर्थात हा अव्यवस्थितपणाही व्यापक व फलदायी होता. या दृष्टीने पाहता या युगाचा प्रवक्ता म्हणून माँतेन मायकेल द. [१२] कडे पाहणे उचित ठरेल.

राजकीय उपपत्तीच्या क्षेत्रातील व्यवस्थाच कोलमडून पडली, जशी ती कलाक्षेत्र वगळता सर्व क्षेत्रात कोलमडून पडली होती. व्यवहारतः मध्ययुग जरी प्रक्षुब्ध होते तरी त्यावर वैचारिक बाबतीत मात्र कायदेशीरपणाचे प्रेम आणि राजकीय सत्तेविषयीचा अतिशय नेमका असा सिद्धान्त यांचा पगडा होता. 'सर्व प्रकारची सत्ता परमेश्वराकडूनच मिळते; त्यानेच तर पारलौकिक बाबतीत पोपच्या हाती सत्ता सोपविली आहे आणि ऐहिक बाबतीत सम्राटांना सत्ता बहाल केली आहे', असा सिद्धान्त मान्य झाला होता. पण पंधराव्या शतकात पोप व सम्राट यांनी सारख्याच प्रकारे स्वतःचे महत्त्व गमावले. इटलीमधील विश्वास बसणार नाही इतक्या गुंतागुंतीच्या आणि तत्त्वहीन राजकारणात गुंतलेल्या अनेक राजपुत्रांपैकी एक राजपुत्र, असे पोपचे स्थान बनले. फ्रान्स, स्पेन व इंग्लंडमध्ये नव्या राष्ट्रीय राजसत्ता अस्तित्वात आल्या. त्यांच्यात पोप किंवा रोमन सम्राटांना ढवळाढवळ करता येणे शक्य नव्हते. इंग्लंडच्या या राष्ट्रीय राज्याने (The National State), मुख्यतः बंदुकीच्या दारूच्या जोरावर माणसांच्या विचारांवर आणि भावनांवर पूर्वी नव्हते इतके प्रभुत्व प्रस्थापित केले. अशा तऱ्हेने संस्कृतीच्या ऐक्यावरील उरलीसुरली रोमन श्रद्धा उत्तरोत्तर चढत्या क्रमाने पार मोडीत काढली.

मॅकियाव्हलीच्या 'प्रिन्स' या छोटेखानी ग्रंथात ती राजकीय अस्थिरता यथार्थपणे व्यक्त झाली आहे. कुठलेही मार्गदर्शक तत्त्व उपलब्ध नसल्यामुळे

राजकारण म्हणजे उघडानागडा सत्तासंघर्ष बनला. असा खेळ यशस्वीरीत्या कसा खेळावा, याचा मुत्सद्दी सल्लाच जणू 'प्रिन्स' मधून मिळतो. ग्रीसच्या महान कालखंडात जे घडले त्याचीच पुनरावृत्ती नवजीवनकालीन इटलीत झाली. पारंपरिक नीतिबंधने लुप्त झाली. कारण त्यांचा संबंध अंधश्रद्धांशी असल्याचे दिसून आले. पायातील बेड्या निखळून पडल्यामुळे अनेकजन उत्साही आणि सर्जक बनले. त्यामुळे इटलीत एक दुर्मिळ असा प्रज्ञामोहोर फुलला. पण नीतितत्त्वे नष्ट झाल्यामुळे अपरिहार्यतेने उगम पावलेल्या निर्नायकी आणि दुष्टाव्यांमुळे इटलीत एक सामूहिक निष्क्रियता फैलावली आणि ग्रीकांप्रमाणेच त्यांनाही स्वतःपेक्षा कमी प्रगत व असंस्कृत असलेल्या पण सामाजिक एकसंधतेला वंचित नसलेल्या देशांची गुलामगिरी पत्करावी लागली.

तथापि ग्रीसवर पूर्वी झाला त्यापेक्षाही या सर्व घटनांचा परिणाम तुलनेने कमी हानिकारक ठरला. कारण स्पेन वगळता इतर नवशक्तिमान राष्ट्रांनी आपण सर्वच श्रेष्ठ उपलब्धींच्या बाबतीत इटालिअनांच्या बरोबरीनेच समर्थ असल्याचे दाखवून दिले.

सोळाव्या शतकानंतर पुनर्रचनेच्या (Reformation) प्रभावाखालीच युरोपीय विचारांचा इतिहास घडत गेला. ती पुनर्रचना चळवळ संकीर्ण व बहुपैलू होती. तिच्या यशाची बीजे अनेकविध होती. मुख्यतः ते रोमच्या पुनरुज्जीवित आधिपत्याविरूद्ध उत्तरेकडील राज्यांनी केलेले बंड होते. उत्तरेला नमविणारी 'धर्म' ही प्रमुख कारकशक्ती होती. पण इटलीत धर्म लयाला गेला होता. पोपसत्ता उरली होती ती 'संस्थेच्या' स्वरूपात, आणि तिने जर्मनी व इंग्लंडकडून मोठ्या प्रमाणात अर्थनिधी मिळविला. पण अजूनही धर्मनिष्ठ असलेल्या या राष्ट्रांना आत्म्यांच्या नरकमुक्तीसाठी मोबदला म्हणून जनतेकडून पैसा लाटण्याऱ्या व तो चैनीत अन् अनैतिकतेत उधळणाऱ्या बॉर्जिआस्[१३] आणि मेडिसीस्[१४] पंथीयांविषयी पूज्यभाव वाटत नव्हता. एकूणात राष्ट्रप्रेरणा, अर्थप्रेरणा आणि नैतिकप्रेरणा या सगळ्या रोमविरोधी बंडाला बळकटी आणण्यासाठी एकवटल्या. या पार्श्वभूमीवर राजपुत्रांच्या एक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे आपल्या प्रांतात चर्च केवळ राष्ट्रीय चर्च बनले तर अशा चर्चवर प्रभाव गाजविणे त्यांना शक्य होईल व ते आधिपत्यात पोपबरोबर वाटेकरी होऊन मिळालेल्या सत्तेपेक्षाही त्यांना स्वतःच्या प्रांतात अधिक प्रबल सत्ता मिळेल. या सर्व कारणसमुच्चयांमुळे मार्टिन ल्यूथरच्या

(१४८३-१५४६) धार्मिक नवसुधारणांचे उत्तर युरोपातील बहुतेक भागात मोठ्या प्रमाणावर राज्यकर्त्यांकडून व जनसामान्यांकडूनही स्वागत झाले.

कॅथॉलिक चर्चची तीन उगमस्थाने आहेत. त्याचा पवित्र इतिहास यहुदींचा (ज्युईश) होता. ईश्वरशास्त्र ग्रीकांचे होते तर शासनयंत्रणा व चर्चप्रणीत कायदेकानू अप्रत्यक्षरीत्या तरी रोमनांचे होते. पुनर्रचनावादाने रोमन तत्त्वे धुडकावली, ग्रीक तत्त्वे सौम्य केली आणि यहुदी धर्मतत्त्वे जरा जास्तच मजबूत बनविली. अशा पद्धतीने प्रथम रोमन साम्राज्याने व नंतर रोमन चर्चने केलेले सामाजिक एकसंधता निर्माण करण्याचे कार्य खिळखिळे करणाऱ्या राष्ट्रवादी शक्तींशी कॅथॉलिक चर्चने हातमिळवणी केली. कॅथॉलिक सिद्धान्तानुसार 'ईश्वरी ज्ञानाचे आविष्करण धर्मग्रंथांबरोबर संपले नाही, तर चर्चच्या माध्यमातून ते प्रत्येक युगात होत राहिले. त्यामुळे या चर्चसमोर व्यक्तिगत मतांची आहुती देणे, हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे, असे मानण्यात त्याची परिणती झाली.

या उलट प्रॉटेस्टंट वादानुसार 'चर्च हे काही दैवी आविष्करणाचे माध्यम होऊच शकत नाही; सत्यासाठी केवळ बायबलचीच कास धरणे आवश्यक आहे. बायबलचा अर्थ प्रत्येक व्यक्ती स्वतःसाठी आपल्या बुद्धिमर्जीनुसार लावू शकते. जर माणसांचे हे अर्थ लावताना मतभेद झाले तर अशी कोणतीही ईश्वरनियुक्त अधिकारी व्यक्ती वा संस्था नसते की जी या वादात निर्णय देईल.' प्रत्यक्षात पूर्वी जो अधिकार चर्चकडे होता, तो राज्यांनी गाजविला आणि राज्यांची ही कृती म्हणजे अधिकारातिक्रमणच होते. प्रॉटेस्टंटवादानुसार आत्मा आणि ईश्वर यांच्या दरम्यान कोणतेही ऐहिक माध्यम असताच कामा नये.

या परिवर्तनाचे परिणाम अगदी चिरसंस्मरणीय ठरले. 'सत्य' हे काही सल्लामसलत करून अधिकारी व्यक्तीमार्फत निश्चित करण्याची बाब उरली नाही तर अंतर्मुख चिंतनाने प्राप्त करून घ्यावयाचे साध्य बनले. परिणामी राजकारणात निर्नायकीपणाची आणि धर्मात गूढवादाची प्रवृत्ती अगदी झपाट्याने शिरली. ती खरे पाहता सनातनी कॅथॉलिक चौकटीत नेहमी कष्टनेच बसविता येण्यासारखी होती. यामुळे काय झाले ? - तर एकच प्रॉटेस्टंटवाद उगम पावला नाही, तर अनेक पंथ पैदा झाले. सांप्रदायिकतेला (Scholasticism) विरोध करणारे एकच तत्त्वज्ञान जन्माला आले नाही, तर जेवढे तत्त्वज्ञ होते तितकी तत्त्वज्ञाने निर्माण झाली. तसेच तेराव्या शतकाप्रमाणे आता पोपविरुद्ध एकच सम्राट नव्हता तर

अनेक पाखंडी राजे होते. याचा परिणाम म्हणजे साहित्यक्षेत्राप्रमाणे विचार-क्षेत्रातही व्यक्तिनिष्ठतावाद सातत्याने खोलवर रुजत गेला. त्या व्यक्तिनिष्ठतावादाने प्रथम आध्यात्मिक गुलामगिरीपासून हितकारक मुक्तता दिली, पण हळूहळू त्याचे रूपांतर व्यक्तीच्या एकाकीपणात झाले, की जो एकाकीपणा सामाजिक शहाणपणाला विघातक होता.

आधुनिक तत्त्वज्ञान सुरू होते ते रेने देकार्तपासून. त्याच्या म्हणण्यानुसार त्याचे विचार व त्याचे अस्तित्व यांनाच मूलभूत निश्चितता आहे. त्यापासून बाह्यजगताचे अस्तित्व अनुमानित करायचे. बर्क्ले व कांट यांच्यामार्फत फिश्टेपर्यंत झालेल्या विचारविकासातला हा पहिला टप्पा होता. फिश्टेच्या मतानुसार 'सर्व काही अहंतत्त्वापासूनच उगम पावते' हा एक शुद्ध वेडेपणाच होता. आणि तेव्हापासून या अतिरेकापासून सुटून दैनंदिन लौकिक शहाणपणाच्या जगाकडे जाण्याचा तत्त्वज्ञानाचा अप्रतिहत प्रयत्न चालू आहे.

तत्त्वज्ञानातील व्यक्तिनिष्ठावाद व राजकारणातील अराजकवाद नेहमी हातात हात घालून जातात. अगोदरच ल्यूथरच्याच जीवनकाळात त्याच्या अनभिनंदित व अज्ञात शिष्यवर्गाने एक बालवयात बाप्तिस्मा करण्याच्या विरोधात सिद्धान्त (Doctrine of Anabaptism) विकसित केला होता व त्या तत्त्वाने म्यून्स्टर शहरावर प्रचंड पगडा बसविला होता. कोणीही चांगली व्यक्ती वर्तनविषयक सूत्रांनी बांधलेली नसते तर प्रत्येक क्षणी पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने जगत असते, अशी धारणा बाळगणाऱ्या या बाप्तिस्माविरोधकांनी सर्व कायदातत्त्वांचे खंडन केले. या आधारविधानावरून ते साम्यवादाकडे आणि लैंगिक संकराकडे वळले. त्यामुळे त्यांनी वीरोचित प्रतिकार केल्यानंतर शेवटी त्यांना धर्मबहिष्कृत करण्यात आले. पण त्यांचा सिद्धान्त सौम्य रूपात हॉलंड, इंग्लंड आणि अमेरिकेत पसरला. ऐतिहासिक दृष्ट्या पाहता तो विचार क्वेकरवादाचाच[१५] उगम ठरला. एकोणिसाव्या शतकात आता धर्माशी संबंधित नसलेला अधिक भयानक निर्नायकवाद जन्माला आला. रशिया, स्पेन तसेच तेवढ्याच प्रमाणात इटलीतही तो बऱ्यापैकी यशस्वी झाला होता. आणि आजही अमेरिकेच्या स्थलांतरपरवाना अधिकाऱ्यांना तो बागुलबुवा होऊन छेडतो आहे. निर्नायकवादाचे हे आधुनिक रूप जरी धर्मविरोधी असले तरी प्रारंभीच्या प्रॉटेस्टंटवादाचा आशय त्यात अंतर्भूत आहेच. त्यात फरक इतकाच की ल्यूथरने पोपसत्तेच्या रोखाने आपले वैर मांडले

होते, तर या आधुनिक तत्त्वाने निधर्मी शासनाशी वैर मांडले आहे.

व्यक्तिनिष्ठता एकदा सैल सोडली की तिने तिचे कार्य पूर्ण केल्याशिवाय तिला मर्यादेत बंदिस्त करता येत नाही. नीतीच्या क्षेत्रात प्रॉटेस्टंटांनी व्यक्तीच्या सदसद्विवेकबुद्धीवर दिलेला भर स्वरूपतःच अराजकप्रवण होता. पण त्यावेळी सवयी आणि रूढी इतक्या मजबूत होत्या की म्यूनस्टरमधील प्रासंगिक उद्रेकासारखा अपवाद वगळता नीतिशास्त्रीय व्यक्तिवादाच्या अनुयायांनी पारंपरिकतया सद्गुणी वर्तन करण्याचा क्रम चालूच ठेवला होता. पण ते एक प्रकारे धोकादायक संतुलन होते. अठराव्या शतकातील 'इंद्रियसंवेदन' सिद्धान्ताने त्याला खिंडार पाडले. आता एखादी कृती चांगला परिणाम घडवून आणते अथवा ती नैतिक आचारसंहितेला अनुसरणारी आहे, यासाठी ती प्रशसंनीय ठरत नव्हती; तर ज्या भावनेपोटी तिचा जन्म होतो, त्या भावनेसाठी ती प्रशसंनीय ठरत होती. या प्रवृत्तीतूनच थॉमस कार्लाईल आणि नीलो यांनी अभिव्यक्त केलेला 'महापुरुष' संप्रदाय (Cult of Hero) पुढे आला. तसेच 'जो भी होगा देखा जायगा' अशा हिंसक भावनेचा बायरन संप्रदाय पुढे आला !

व्यक्तींचे मूल्यमापन 'समाजाचे सदस्य' म्हणून नव्हे तर सौंदर्यशास्त्रदृष्ट्या आनंददायक असे चिंतनविषय म्हणून करण्याच्या या व्यक्तिवादी पद्धतीशी कला, साहित्य आणि राजकारणातील स्वच्छंदवादी चळवळ निगडीत आहे. शेळ्या-मेंढ्यापेक्षा वाघ कधीही देखणेच असतात, पण गजाआड ! नमुनेदार स्वच्छंदवादी माणूस हे गज काढून टाकतो आणि मेंढ्या गिळंकृत करणाऱ्या वाघाच्या दिमाखदार पल्लेदार झेपेचं रसग्रहण करतो !! माणसांनी स्वतःला वाघाच्या जागी कल्पावे असा आग्रह तो धरतो आणि जेव्हा त्यात यशस्वी होतो तेव्हा शेवट पूर्णतः सुखदायी असतोच असे नाही.

आधुनिक काळातील व्यक्तिनिष्ठतेच्या जास्तच वेडपर आविष्करणांच्या विरोधात वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. पहिली : एक अर्धवट तडजोडीचे तत्त्वज्ञान अर्थात् उदारमतवादाचा[१६] सिद्धान्त – ज्याने शासनाची आणि व्यक्तीची कार्यकक्षा ठरवून देण्याचा प्रयत्न केला. त्याची आधुनिक स्वरूपातील सुरुवात प्रसिद्ध अनुभववादी तत्त्वज्ञ जॉन लॉकपासून होते. त्याने बाप्तिस्माविरोधकाच्या व्यक्तिवादी अतिउत्साहाला खूप विरोध केला आणि तितकाच विरोध धर्मपीठाच्या परम-प्रामाण्याला व परंपरेपुढे अंध शरणागती पत्करण्याच्या प्रवृत्तीला केला.

व्यक्तिवादा विरुद्धचे मूलगामी बंड आपणास 'राज्यपूजातत्त्वाकडे' नेते. कॅथॉलिक पंथाने जे स्थान चर्चला किंवा कधी कधी ईश्वरालाही दिले ते स्थान हे तत्त्व राज्याला देते. या सिद्धान्ताच्या विविध स्थित्यंतरांचे प्रतिनिधी म्हणजे हॉब्ज, रूसो, आणि हेगेल. त्यांचे सिद्धान्त प्रत्यक्षात मूर्त झाले ते 'क्रॉमवेल'च्या रूपात. नेपोलियन आणि आधुनिक जर्मनी आता सैद्धांतिक दृष्ट्या पाहता साम्यवादी तत्त्वज्ञानापासून फार दूर गेला आहे. परन्तु प्रत्यक्षात तो राज्यपूजाप्रवृत्तीतून फलित होणाऱ्या समाजपद्धतीसारख्याच समाजपद्धतीकडे नेतो.

इसवीसनपूर्व सहाशे ते आजपर्यंतच्या या वैचारिक क्षेत्रातील प्रदीर्घ विकास-क्रमामध्ये सामाजिक बंधने ताठर करू इच्छिणारे आणि ती शिथिल करू इच्छिणारे अशा दोन गटांत तत्त्वज्ञ विभागले गेले आहेत. त्यांच्यातील इतर फरक या भेदांशी संबंधित आहेत. शिस्तीचे भोक्ते असणाऱ्यांनी कुठल्यातरी एका - जुन्या वा नव्या - दुराग्रही प्रणालीचा पुरस्कार केला आणि त्यांची ती दुराग्रही मते अनुभवसिद्ध होऊ शकत नसल्याने कमीजास्त प्रमाणात ते विज्ञानाचे शत्रूच बनले ! 'आनंदी असणे' हे खरे चांगुलपण नाही तर 'आर्यत्व' अथवा 'महापुरुषत्व' हेच अधिक योग्य आहे, अशी शिकवण त्यांनी सातत्याने दिली. सामाजिक सहकार्यात्मक एकजुटीला तर्कबुद्धी अपायकारक ठरते, अशी त्यांची श्रद्धा असल्याने त्यांनी मानवी स्वभावातील तर्कविसंगत पैलूंकडे सहानुभूतीने पाहिले. या उलट काही टोकाचे अराजकवादी वगळता सर्वच उदारमतवाद्यांचा मात्र विज्ञाननिष्ठ, उपयुक्ततावादी व बुद्धिवादी होण्याकडे कल होता. तसेच त्यांनी भडक भावनांच्या विरोधी व धर्माच्या सर्वच गंभीरतर रूपांबाबत विरोधी भूमिका स्वीकारली. ज्याला आपण आज 'तत्त्वज्ञान' म्हणून ओळखतो त्याचा उगम-होण्यापूर्वी प्राचीन ग्रीसमध्ये हा संघर्ष अस्तित्वात होता आणि प्राचीन ग्रीक विचारविश्वात तो अगदी ठळकपणे आविष्कृत झालेला दिसतो. बदलत्या स्वरूपात तो आजही चालू राहिला आहे. आणि येणाऱ्या अनेक युगांत तो चालूच राहणार हे अगदी निःसंशय.

कोणत्याही दीर्घकाळ चालू राहणाऱ्या वादात जसे असते, त्याप्रमाणे या वादातील दोन्ही पक्ष काही प्रमाणात सत्य व काही प्रमाणात असत्य आहेत, हे स्पष्ट आहे. सामाजिक एकजूट अगदी आवश्यक आहे, हे खरेच आणि केवळ बौद्धिक युक्तिवादांनी सामाजिक एकजूट प्रस्थापित करण्यात मानवजातीला अद्याप

तरी यश प्राप्त झालेले नाही. प्रत्येक समाजापुढे दोन परस्परविरोधी धोके असतात. एका बाजूला शिस्तीचा अतिरेक आणि परंपरेसंबंधी आत्यंतिक पूज्यभाव. यामुळे एका बाजूला अस्थिपंजरवत होण्याचा धोका आणि दुसऱ्या बाजूला व्यक्तिवाद आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा असा विकास की ज्यामुळे सहकार्यच अशक्यप्राय व्हावे आणि त्यातून लयाला जाणे किंवा परकीय आक्रमणाला बळी पडणे, अनिवार्य ठरू लागते.

सर्वसाधारणपणे महत्त्वाच्या संस्कृतीची सुरूवात होते ती ताठर आणि अंधश्रद्ध प्रणालीने. तीत हळूहळू शिथिलता येते आणि एक विशिष्ट अवस्थेत ती चमकदार प्रज्ञापूर्ण कालखंडात ती परिणत होते, की ज्यात जुन्या परंपरेतील चांगले टिकून राहते आणि त्याच्या विनाशाच्या मुळाशी असलेले दुरित मात्र अद्याप विकसित झालेले नसते. पण ते दुरित जेव्हा आपले अस्तित्व प्रगट करू लागते तेव्हा माजते अराजक व त्यातून अनिवार्यपणे पुढे येते नवी जुलुमी सत्ता! त्यातूनच नव्या दुराग्रही प्रणालीने सुरक्षित केलेला असा नवा समन्वय उत्पन्न होतो. उदारमतवादाचा सिद्धांत हा या अंतहीन हेलकाव्यांमधून निसटण्याचा एक प्रयत्न आहे.

उदारमतवादाचे सार म्हणजे एकतर अशी सामाजिक रचना प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आहे की जी तर्कविसंगत मताग्रहावर आधारित नसेल, आणि दुसरे समाजसातत्यासाठी जेवढी बंधने आवश्यक त्यापेक्षा जास्त बंधनात न अडकता समाज स्थैर्याची खात्री देणे ! हा प्रयत्न सुफलसंपन्न होऊ शकेल काय, ते भविष्यकाळच ठरवू शकेल.*

**-बर्ट्रंड रसेल**

अनुवाद : **श्रीनिवास हेमाडे**

तत्त्वज्ञान विभाग,
संगमनेर कॉलेज,
संगमनेर (जि. अहमदनगर)

* History of Western Philosophy by Bertrand Russell, Simon and Schuster, New York, 1945, pp xiii-xxiii

## टीपा

### (I) रसेलच्या टीपा

अ) पूर्वीच्या काळात हे मत अगदीच अज्ञात होते, असे नव्हे. उदाहरणार्थ सोफोक्लिसच्या 'अँटिगनी' नाटकात ते मांडण्यात आले होते. तथापि स्टोईकांपूर्वी (सुद्धा) ज्यांनी ते मांडले ते संख्येने अगदीच नगण्य होते.

ब) त्यामुळेच की काय, आपण स्टॅलीनपेक्षा द्वंद्वविकासी भौतिक-वादासच मान्यता दिली पाहिजे, असा विचार आधुनिक रशिअन करीत नाहीत.

### (II) अनुवादकाच्या टीपा

१. Philosophy आणि Philosophical या मूळ इंग्लीश शब्दासाठी मी स्थूलमानाने 'तत्त्वज्ञान' आणि 'तात्त्विक' असे पर्यायी अनुवाद केले आहेत. तथापि मूळ इंग्लीश व मूळ संस्कृत संज्ञांच्या अर्थात फरक आहेत. ते अर्थात सर्वज्ञात आहेत. त्यामुळे पुनरावृत्तीचा दोष टाळतो.

२. नगरराज्य - City sate

३. नगर -City अनुषंगाने Citizen- नागरिक

४. Pagans 'मूर्तिपूजक' असा अर्थ त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीच्या संदर्भात केला आहे. लॅटिनमधील Pagus म्हणजे खेडे; त्यापासून लॅटिन शब्द Paganus म्हणजे 'खेड्यात राहणारा'. पाश्चात्यांमध्ये हाच अर्थ रुढ झाला. तथापि ग्रीक भाषेत Paganikos म्हणजे Secular हा अर्थ Sacred चा विरोधी अर्थ प्रचलित झाला. प्रारंभी जी ख्रिस्ती चर्चे स्थापन झाली ती शहरात स्थापन झाली. ग्रामीण जनता बहुदेवतामूर्तिपूजक होती. ख्रिस्तीधर्मी तिला 'खोट्या देवांची पूजा करणारी'असे संबोधित. त्यावरुन ख्रिस्ती देवधर्म न मानणारे ते Pagan असा अर्थ रुढ झाला. नंतर ज्यू आणि इस्लाम धर्म न मानणाऱ्यांनाही Paganम्हणतात येऊ लागले. Paganहा ख्रिस्तपूर्वकालीन चाली-रीती, श्रद्धा, कल्पना, भावना किंवा या सर्वांचे मागे राहिलेले अवशेष, या अर्थीही वापरात आला. त्या शब्दाने

काहीशी अलिप्तेची भावना-निरपेक्ष दृष्टीही सूचित होते. Pagan आणि Paganism हे सामान्यतः ख्रिस्तपूर्व संस्कृतीच्या संदर्भात वापरण्यात येतात. विशेषतः पोथिनिष्ठेपासून भिन्नता दर्शविण्यासाठी ते उपयोजिले जातात. Pagan नी निसर्गधर्माचा मेळ ख्रिस्तीधर्माशी घालाण्याचा प्रयत्न केला. परिणामी काही मध्ययुगीन ईश्वरशास्त्र-वाद्यांनी या मताचा पुरस्कार केला. सेंट ऑगस्टीन हा पाद्रीयुगाचा सर्वश्रेष्ठ विद्वान Pagan.

५. **अलेक्झांड्रिआचा एक पाद्री एरिअस (इसवी सन २५६-३३६)** याच्या मते 'ईश्वर एकच, निरवयव, मोनाड असून त्यात पिता,पुत्र व आत्मा असे त्रैत नाही. त्याचे सामर्थ्य एवंगुणवैशिष्ट्यपूर्ण असून इतर वस्तूंशी त्याचे नातेसुद्धा त्याच धर्तीचे आहे. पिता (ईश्वर) व पुत्र (येशू) यांचे नातेही एकेरी आहे. अवतार घेण्यापूर्वी पुत्राला अस्तित्त्व असले तरी तै अनादी कालापासूनचे नाही; प्रेषित हा दैवी पुरुष आहे.' एरिअसच्या या मताचे पुरस्कर्ते ते एरिअनवादी.

६. **डेन्स हे राजवंशाचे नाव :** नवव्या शतकात डेन लोकांनी ब्रिटनवर स्वाऱ्या सुरू केल्या. त्या शतकाअखेर डेन राजा गुथ्रम व ब्रिटन राजा आल्फ्रेड यांच्यात तहनामा होऊन ईस्ट आंग्लिया प्रांतात गुथ्रम राजा स्वस्थचित्ताने राज्य करू लागला. दहाव्या शतकापूर्वी डेन राजांच्या पुन्हा स्वाऱ्या झाल्या. त्यापैकी कॅन्यूट हा डेन राजा (१०१६-१०३५) हा प्रसिद्ध होता.

७. **स्कॉटस एरिजेना :** जॉन स्कॉटस एरिजेना (सुमारे इ. स. ८१०-८७७) पाश्चात्य तत्त्वज्ञानात व ईश्वरशास्त्रातील महत्त्वाचा विचारवंत. एरिजेना नावावरून तो एरिर् किंवा आयर्लंड मधील असावा. स्कॉटस-वरून मात्र काही वेगळ्या जन्मभूमीचा निर्देश होत नाही. कारण तेव्हा आयर्लंडचे नाव स्कोटिआ मेयोर होते. चार्लस-द-बाल्ड या राजाच्या विनंतीवरून त्याने 'स्यूडो-डायोनिशस', मॅक्सिमस आणि ग्रेगरी ऑफ नायस्साचे ग्रीकवरून लॅटीनमध्ये भाषांतर केले. त्याचा महत्त्वाचा ग्रंथ : 'दि डिव्हीजन ऑफ नेचर'

८. **मार्कस ऑरेलिअसः** हा एक रोमन सम्राट सन १२१-१८० दरम्यान होऊन गेला. तो परंपरेने स्टोईक होता व प्रसिद्ध तत्त्वज्ञ होता. 'सर्व माणसे समान आहेत' या स्टोईकाच्या मानवतावादी सूत्राला त्याने त्याच्या 'मेडिटेशन्स' या बारा खंडाच्या ग्रंथात समान हक्क, समान भाषण स्वातंत्र्य आणि या सर्वांचा आदर करणाऱ्या उमद्या, स्वतंत्र शासन, या तत्त्वांचा आधार दिला. हे साधणारी शिक्षणव्यवस्था त्याला अपेक्षित होती.

९. **Teutonic Descent:** ट्यूटन ही प्राचीन आर्यांपैकी एक वंशशाखा. आर्य इंडो-युरोपिअन् भाषा बोलणारे होते. आंग्ल-सॅक्सन हे मुख्यतः ट्यूटन होते. इंग्लिश, जर्मन, डच आणि स्कॅंडिनेव्हीअन भाषाकुलाचे Teutonic हे विशेषण आहे. त्यानुसार Teutonic = Germamic भाषेनुसार Teutonic चे तीन वर्ग पडतात. नॉर्थ, वेस्ट व ईस्ट जर्मनिक.

१०. **The Great Schism :** मूळ ग्रीक शब्द Schizen म्हणजे to split असा होय त्याचे इंग्लीश रूपांतर division असे होय. नंतर अर्थ संदर्भानुसार 'चर्चमधील दुही' असा झाला. New Testament मध्ये हा शब्द फक्त स्थानिक, स्वतंत्र धर्मपद्धतीच्या पक्षाबाबत (Congregation parties) उपयोगात आणला गेला.

सुरुवातीला हा शब्द चर्चपासून फुटलेल्या आणि वेगळा पंथ स्थापन करणाऱ्यांसाठी वापरला जात असे. बायबलमधील मूळ सिद्धान्ताच्या विवरण, स्पष्टीकरणावरून ज्यांच्यात गटतट पडले, त्यांच्यासाठी हा शब्द वापरला गेला. या गटातटातून निर्माण झालेल्यांना साहजिकच कसलाही वारसा नव्हता. पण प्राचीन चर्चमधील काही धर्मगुरूंच्या मते हा काही 'टिकणारा पंथ' नव्हता; तर काहींच्या मते तो नंतर टिकाऊ व वारसासंपन्न बनविला गेला. पुन्हा कालांतराने Schisms व heresy (पाखंडी - ख्रिस्त धर्मविरोधी) यातील फरक स्पष्ट होत गेला.

सोळव्या शतकातील प्रॉटेस्टंटांच्या धर्मसुधारणेपर्यंत सर्वात लक्षणीय दुही म्हणजे पौर्वात्य दुही होत्या. ज्यामुळे ख्रिस्ती जगत हे पाश्चात्य

म्हणजे रोमन कॅथॉलिक आणि पौर्वात्य (Orthodox) असे विभागले गेले. या घटना १३१७-१४१७ दरम्यान घडत गेल्या. यातील रोमन कॅथॉलिकांच्या मते बाप्तिस्मा झालेली व्यक्ती स्वतःला ख्रिश्चन म्हणवून घेत असली तरी ती पोप किंवा चर्चच्या सदस्याला कबुलीजबाब देणारी नसते.

**Schism of 1054 :** ख्रिस्ती इतिहासकारांनी अशा महान दुहींचा इतिहास लिहिला. पूर्वचर्च व पाश्चात्यचर्च यांमधील दुहीची तारीख म्हणून त्यांनी १०५४ हे साल निश्चित केले. पूर्वचर्चचे नेतृत्व कॉस्टँटिनोपलचा पिता मायकेल सिरेलॅरियस यांनी केले आणि पाश्चात्य चर्चचे नेतृत्व पोप लिओ नववा याने केले.

विसाव्या शतकातसुद्धा अशी दुही झाली. तथापि १९६२-६५ च्या दरम्यान झालेल्या दुसऱ्या व्हॅटीकन कौन्सिलनंतर ती मिटविण्यात आली (?) (पहिली कौन्सिल १८७० मध्ये झाली.) अद्यापही ते प्रयत्न चालू आहेत. पण क्षीण पडले आहेत.

१०. **The Conciliar, Movement** : पोपला असलेल्या अधिकारांपेक्षाही सर्वात जास्त अधिकार चर्चच्या विधिसभेला (general council) आहे, असा सिद्धान्त मध्ययुगीन रोमन कॅथॉलिक चर्चने मांडला. आणि आवश्यक असेल तर पोपला पदच्युत करण्याचाही अधिकार विधिसभेला आहे, अशी पुष्टी जोडली. या वादाला Conciliriasm म्हणतात.

पोपच्या जागेच्या अधिकाराच्या न्याय्य मर्यादा निश्चित १२-१३ व्या शतकातील, कायदाज्ञात झालेल्या चर्चेत या वादाचे मूळ आहे. या सिद्धान्ताचे मौलिक स्वरूप म्हणजे Marsilius of Padua या इटालिअन राजकीय तत्त्वज्ञाच्या आणि William of Ockham या इंग्लिश तत्त्वज्ञाच्या लेखनात सापडते. Marsilius च्या मते पोपच्या अधिकारास म्हणजे पोपसत्ताक अधिकारास कसलाही दैवी आधार ठरलेला नाही. तर विल्यमच्या मते फक्त चर्च अन् चर्चच ईश्वरावरील विश्वासास पात्र असते - एखादी पोपसारखी सुटी व्यक्ती किंवा विधिसभेसारखी सुट्या व्यक्तींचा समूह पात्र

असतो.

पंधराव्या शतकातील ख्रिस्ती जगतातील एकूण घटनांमुळे या सिद्धान्ताला, वादाला जणू प्रात्याक्षिकच मिळाले. परिणामी त्याला गंभीर स्वरूप प्राप्त झाले. उदाहणार्थ Constance Council ने (१४१४-१८) पोपचे सर्व अधिकार नाकारून St. Peter चा उत्तराधिकारी म्हणून Pope Martin पाचवा याला निवडले. त्यातूनच पुढे Great Schism म्हणून ओळखली जाणारी दुही पैदा झाली. हा काळ १३७८-१४१७ दरम्यानचा. तथापि या Council ला रोमकडून अथवा अन्य कुणाकडूनही कसलीही मान्यता मिळू शकली नाही. मात्र त्यांनी John Wycliff आणि Jan Hus या धर्मसुधारणा काळास प्रारंभ होण्यापूर्वीच्या काळातही सुधारकांना ठोठावण्यात आलेल्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केले. तरीही Conciliriasm बरोबर असलेल्या (espousing) त्यांचा अतिपवित्रतेचा (sacrosancta) दावा मात्र फेटाळून लावला गेला. ख्रिस्ती धर्मस्थापनेनंतर चर्चला संस्थात्मक स्वरूप झाल्यानंतरही बऱ्याच उशीरा १८७० मध्ये पहिली Vatican Council झाली. त्यात Conciliriasm चा जाहीर तीव्र निषेध करण्यात आला. मात्र दुसरी Vatican Council अलिकडेच १९६२-६५ दरम्यान भरविण्यात आली. त्यात Bishops College चा सदस्य व प्रमुख म्हणून पोपला खास दर्जा बहाल करण्यात आला.

१२. **मॉंतेन मायकेल द. :** मॉंतेनचा काल १५३३-९२ श्रेष्ठ दर्जाचा फ्रेंच निबंधकार आणि तत्त्वचिंतक. त्याचे वडिल रोमन कॅथॉलिक तर आई स्पॅनिश ज्यू होती. मॉंतेनचे निबंध इंग्लिश निबंधलेखनाचे जनकच ठरले. इंग्लिशमधील एसे हा शब्द मॉंतेनच्या 'एसॅ' (प्रयत्न) त्या शब्दावरून तयार झाला. मॉंतेनचे लेखन प्रबोधनयुगाचे लोभस वैचारिक फळ होते.

प्राचीन अभिजात लेखकांच्या (विशेषतः प्लुटार्क) विचारांवरील सहजस्फूर्त चिंतन-मनन असे 'एसॅ' चे प्रारंभीचे स्वरूप होते. नंतर मात्र मॉंतेनच्या लेखनास त्याच्या सहिष्णु आत्मपरीक्षणाची जोड

दिलेली आढळते. या आत्मपरीक्षणातूनच तो मानवी स्वभावाची व समाजाची चिकित्सा करतो. अंतिम साध्यासंबंधी तो संशयवादी भूमिका घेतो व 'निसर्गाकडे परत फिरा' असा सल्ला देतो.

१३. **बॉर्जिआस पंथ** : Borgia CeSare हा १४७५/७६ ते १५०७ दरम्यानचा सत्ताधारी. प्रबोधनकालीन सर्वात वादग्रस्त व बदमाश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अलेक्झांडर सहावा याचा Borgia हा मुलगा. तो रोमॅग्नाचा ड्यूक (Duke of the Romagna) होता. एकूणच Borgia Family जबरदस्त आक्रमक व सत्तापिपासू होती. Borgia ने चर्चला हाताशी धरून पोपची राजकीय सत्ता अमर्यादितपणे वाढविली. त्याचे वडील अलेक्झांडर सहावे यांची निवड १४९२ ला त्याने कारस्थाने करून करविली. त्याला फ्रेंचांचा पाठिंबा मिळाला. सत्तेसाठी त्याने बहिणीच्या नवऱ्याचा १५०२ ला खून केला. पुढे बाप मेल्यानंतर त्याला अटक झाली. तो तुरुंगातून पळाला. पण चकमकीत मारला गेला. त्याच्या एकूण व्यक्तिमत्वावरून मॅकियाव्हेलीच्या 'प्रिन्स'चा तो तर जिताजागता वस्तुपाठच होता.

१४. **मेडिसी पंथ** : Medici Family ही १४३४ ते १७३७ दरम्यान Florence आणि TuScany प्रांतांवर राज्य करणारी, महत्त्वाकांक्षी इटलिअन् फॅमिली होती. (मार्क्सच्या परिभाषेत) त्यांचा उगम तत्कालीन Bourgeois मधून झाला. त्यांनी उच्चवर्गीयांशी विवाहसंबंध जोडले. या Family तून एकूण तीन पोप निर्माण झाले. युरोपातील विविध कलाशास्त्रांचेही जनक-पालक होते.

१५. **क्वेकरवाद** : Quakers=Friends हा एक धार्मिकांचा पंथ होता. १७व्या शतकाच्या मध्यावर इंग्लंड, अमेरिकन वसाहतीत तो उदयास आला. एखादे तत्त्व, धर्मगुरू किंवा इतर कोणत्याही स्वरूपाच्या माध्यमाशिवाय ईश्वराचे अंतःकरणामध्ये थेट आविष्करण होते, या आविष्करणानुसार जीवन जगणे हेच खऱ्या ख्रिश्चनाचे लक्षण असते, अशी या पंथाची श्रद्धा होती. त्यांना Quakers म्हणतात. या पंथाचा संस्थापक म्हणजे जॉर्ज फॉक्स (१६२४-१६९१). या

पंथाला 'मित्रसंघ' (Society of Friends) असेही नाव आहे. 'अंतःकरणातील प्रकाश' म्हणजेच 'प्रत्येकामध्ये ईश्वर' ही धारणा समाजपरिवर्तनास उपयोगी पडेल असा या मित्रसंघाचा विश्वास होता.